# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-४११००१

फोननं.(०२०) २६०५१११०, २६०५११७७, २६०५४१४१, २६०५०६४१ ई-मेलआयडी :- sceapune@gmail.com

जा.क्रं.रासनिप्रा/अभि.धा.क्रं.२/जि.सह.नि.अधि.घो.म्हाडा/२०१६/७३६२ दिनांक-३/१२/२०१६

**वाचावे**-१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२.शासन अधिसुचना दिनांक ३०/०३/२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४
४. शासन निर्णय क्रं.राजस-२०१६ प्र.क्रं.८५/५-स दिनांक २५/०१/२०१६
५. प्राधिकरणाकडील आदेश क्रं.रासनिप्रा/जिल्हासनि आदेश/सन २०१४/५४९ दिनांक १०/१०/२०१४
६ प्राधिकरणाकडील आदेश जा.क्रं.प्रतिनि/२०१६/३२३७/प्र.८ दिनांक ०७/०७/२०१६
७ शासन राजपत्र क्रं.सीएसएल ०९१६/प्र.क्रं.९५/१३-स दिनांक २५/११/२०१६

## ----:आदेश:---

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दिनांक १३ ऑगसट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार राज्यातील सर्व सहकारी संसथांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतूद आहे. आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४ अन्वये अधिसुचीत करण्यात आलेले आहेत. आणि सदर नियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संसथांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्रं.२ (८) नुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील त्या त्या जिल्हयातील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रात जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त असल्याने प्राधिकरणाने उपरोक्त वाचावे क्रं.५ अन्वये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या नियुक्त्या केल्या होत्या आणि

ज्याअर्थी, उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांना त्यांच्या वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सहकारी व्यापारी संकुल संसथा यांचे वैधानिक अधिकार त्यांचेकडे असल्याने अशा

सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून उपरोक्त वाचावे ३ अन्वये घोषित करण्यात आले होते आणि

ज्याअर्थी, उपनिबंधक, सहकारी म्हाडा या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भ क्रं.४ शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१६ अन्वये विभाजन होउन खालीलप्रमाणे दोन उपनिबंधक,सहकारी संस्था मध्ये त्यांचे कार्यक्षेत्र विभागले गेले आहे.

| अ.क्रं. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | उपनिबंधक, सहकारी संस्था, (मुंबई पूर्व व पश्चिम उपनगरे ) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई | मुंबई पूर्व व पश्चिम उपनगरे |
| २ | उपनिबंधक, सहकारी संस्था, (मुंबई शहर व कोकण मंडळ) कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई | मुंबई शहर व कोकण मंडळ, म्हाडा, मुंबई |

ज्याअर्थी उपरोक्त वाचावे क्रं.७ चे शासन राजपत्रानुसार उक्त दोन्ही पदांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे त्यांचे त्यांचे वैधानिक क्षेत्रात अधिकार प्रदान केले आहेत आणि

ज्याअर्थी, उक्त नमूद सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमातील नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारास अनुसरुन उपरोक्त वाचावे क्रं.५ दिनांक १०/१०/२०१४ नुसार उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई (म्हाडा) यांचे कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांपुरते कार्यक्षेत्रासाठी घोषित केलेल्या जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांचे कार्यक्षेत्रातून उपरोक्त वाचावे क्रं.४ दिनांक २५/१०/२०१६ नुसार वगळणे क्रमप्राप्त आहे आणि

त्याअर्थी प्राधिकरणात खालीलप्रमाणे नव्याने स्तंभ २ मधील अधिकारी यांना स्तंभ ३ मधील त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रातील, सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून घोषित करीत आहे.

| अ.क्रं. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | उपनिबंधक, सहकारी संस्था, (मुंबई पूर्व व पश्चिम उपनगरे ) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई | मुंबई पूर्व व पश्चिम उपनगरे |
| २ | उपनिबंधक, सहकारी संस्था, (मुंबई शहर व कोकण मंडळ) कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई | मुंबई शहर व कोकण मंडळ, म्हाडा, मुंबई |

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,म.रा.पुणे यांच्या आदेशाने.**

(डॉ.आनंद जोगदंड )
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**
संबंधित जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
**प्रत माहितीस्तव :**
१.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
**प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना-**
३.मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे